# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल— pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ — साफुपुवि/निवि/1920 दिनांक ०९/१२/२०१४

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय — वाहनतळ शुल्कासंदर्भात.**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार वाहनतळ शुल्क आकारण्यासंदर्भात महाविद्यालय/संस्था स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. सदरहू मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द झालेल्या तारखेपासून त्वरित करावी.

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास

सोबत — मार्गदर्शक तत्वे.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थामध्ये वाहनतळ शुल्क आकारण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे.**

१) महाविद्यालये/संस्थामध्ये जे विद्यार्थी/विद्यार्थीनी उपस्थित राहण्यासाठी सायकलचा वापर करीत आहेत. अशा सर्व संबंधित विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालये/संस्थामध्ये पार्किंगची सुविधा विनाशुल्क पुरविण्यात यावी.

२) शाररिकदृष्टया अपंग विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी महाविद्यालये/संस्थामध्ये ते वापरत असलेल्या वाहनांसाठी पार्किंगची सुविधा विनाशुल्क पुरविण्यात यावी.

३) दुचाकी वाहनतळ शुल्क माफक असावे, परंतु त्याचे स्वरूप व्यावसायिक नसावे. वाहनतळाची दैनंदिन स्वच्छता, पावसाळी पाणी, वाहनांची व्यवस्था, वाहनतळातील फरशांची डागडूजी, दुचाकी गाडया वाहनतळावर व्यवस्थितपणे लावण्यासाठी रंगांच्या पट्टयांची आखणी, सायंकालीन वर्गांच्या दृष्टीने वाहनतळावर करावी लागणारी प्रकाश व्यवस्था, वाहन तळाच्या नियमांबाबतीत योग्य त्या सुचनांचे फलक, वाहनतळावरील दररोजच्या शिस्तीसाठी व देखरेखीसाठी दिवसभर नेमावा लागणारा/लागणारे सेवक यांचे वेतन/मेहनताना इत्यादी बाबींसाठी येणा—या खर्चाचा विचार करून पुढीलप्रमाणे शुल्क आकारण्याबाबत सुचना करण्यात येत आहेत.

महाविद्यालय/संस्थेत प्रवेश घेणा—या नियमित विद्यार्थी/विद्यार्थीनीपैकी जे विद्यार्थी/विद्यार्थीनी वाहनतळाचा वापर करणार आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी मासिक पास रू.५०/— किंवा वार्षिक पास एकरकमी रु.५००/— किंवा सहामाही पास रु.३००/— असे पार्कींग शुल्क आकारण्यात यावे. तसेच जे विद्यार्थी/विद्यार्थीनी मासिक/सहामाही/वार्षिक शुल्क एकरकमी भरू शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांकडून दैनंदिन शुल्क रु.३/— आकारण्यात यावे.

४) कार्यालयीन कामासाठी महाविद्यालयात/संस्थेत येणारे विद्यापीठ व महाविद्यालयांमधील शिक्षक, शिक्षकेतर सेवकांसाठी विनाशुल्क पार्किंगची सुविधा उपलब्ध करुन दयावी.

५) वरील सेवकांव्यतिरिक्त महाविद्यालयात भेटीसाठी/कामासाठी येणा—या व्हिजीटर्सकडून दुचाकी वाहनास प्रत्येकी रु.१०/— शुल्क आकारण्यात यावे. व्हिजीटर्सच्या चारचाकी वाहनांना महाविद्यालयात पार्किंगसाठी सुविधा दिली जाऊ नये.

६) वाहनतळ शुल्क आकारणीचा तक्ता महाविद्यालय/संस्थेच्या प्रवेशद्वार अथवा पार्किंगच्या ठिकाणी स्पष्ट दिसेल असा लावण्यात यावा.

७) महाविद्यालये/संस्थेमध्ये जे नियमित विद्यार्थी/विद्यार्थीनी उपस्थित राहण्यासाठी दररोज चारचाकी वाहनाने येतात, अशा सर्व संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या चारचाकी वाहनांना महाविद्यालय/संस्थेत पार्कीगसाठी सुविधा दिली जावू नये.

८) महाविद्यालय/संस्थेमध्ये जेथे पार्कीगची सोय उपलब्ध करून दिलेली असेल त्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दुष्टीकोनातून सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात यावी. तसेच वाहनतळामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमे—याची व्यवस्था करणे अनिवार्य आहे. तसेच वाहन पार्कींग करण्याची जागा शक्यतो आच्छादित असावी..

९) जी महाविद्यालये/संस्था शहराच्या मध्यवस्तीत तसेच गर्दीच्या ठिकाणी आहेत. अशा महाविद्यालये/संस्थांमध्ये वारंवार होणारी गर्दी, जागेचा अभाव, वाहतुकीची कोंडी या सर्व बाबींवर मा. प्राचार्य यांनी त्यांच्या अधिकारात योग्य तो निर्णय घ्यावा.

१०) ज्या महाविद्यालये/संस्थांना पार्किंग सुविधा मोफत पुरविणे शक्य आहे अशा महाविद्यालये/संस्थांनी त्यांच्या स्तरावर याबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यास हरकत नाही.

*******